**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७५२/२०२३ मधील नि.०५ खालील आदेश</u>**
**<u>सैफ मुल्ला वगैरे वि.महाराष्ट्र शासन तर्फे मा. जिल्हाधिकारी सो, सातारा वगैरे</u>**
**<u>CNR NO.MHST050048542023</u>**

वादीने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत दाखल करुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी रस्ता मागणी अर्ज एस.आर. ७७/२०१८ आदेशानुसार रस्त्याचे बांधकाम वादीच्या मिळकतीमध्ये करु नये असा अंतरिम मनाई आदेश मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. वादींचा थोडक्यात दावा असा की–

वादी हा दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस मालक या नात्याने आहे. प्रतिवादी क्र.४ यांचा दावा मिळकतीशी कसलाही संबंध नव्हता. प्रतिवादी क्र.४ यांना वादीचे दावा मिळकतीबाबत जाणे–येणेचा किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा सुविधाकार, हक्क, हितसंबंध केव्हाही नव्हता. वादींनी दावा मिळकत कायम खुषखरेदी घेतलेबाबत प्रतिवादी क्र.४ यांना पूर्ण माहिती व जाणीव होती. प्रतिवादी क्र.४ यांनी प्रतिवादी क्र.२ यांचेकडे केलेले रस्ता मागणी अर्ज एस.आर.७७/२०१८ या अर्जाचे कामी मौजे पेरले येथील गट क्र.३९३,३९४,३९५ या मिळकती करीता मौजे पेरले येथील शेतजमीन मिळकत गट क्र.३९९,४०५,४०७,४०८,४०९,४१०,४११,४१२,४१७,४१८ या मिळकती मधून दक्षिण उत्तर अंदाजे १००० फुट लांबीचा व पुर्व पश्चिम अंदाजे १० ते १४ फुट रुंदीचा सरबांध असल्याचे कथन करुन त्यावरुन शेतरस्ता मिळण्याची मागणी केली होती. वास्तविक प्रतिवादी क्र.४ याने अर्जात नमूद केल्याप्रमाणे कोणताही सरबांध अस्तित्वात नसतानाही महसुल खात्याकडून दि.०८.०७.२०२२ रोजी रस्ता करण्या

संदर्भात आदेश पारीत करण्यात आला व सदर रस्ता तयार करताना कोणीही हरकत अडथळा करु नये म्हणून मनाई देखील देण्यात आली. मंजूर झालेला रस्ता अस्तित्वात आल्यास वादी यांचे पिकाखालचे क्षेत्र रस्त्यामध्ये गेल्यामुळे वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तसेच महसुल खात्याकडून झालेले आदेश हे बेकायदेशीर झाले आहेत असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करुन मनाई मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे नि.३८ वर व प्रतिवादी क्र.४ तर्फे नि.३४ वर म्हणणे दाखल करण्यात आले. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम १४३ नुसार तहसिलदार यांना आदेश पारीत करण्याचे अधिकार आहेत व त्यानुसारच दि.०८.०७.२०२२ रोजी आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.४ चे असे म्हणणे आहे की, त्याला त्याच्या क्षेत्रात जाण्या येण्याकरीता रस्ता नसल्यामुळे त्याने अर्ज केला. त्याप्रमाणे दि.०८.०७.२०२२ रोजी आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे युक्तीवाद करण्यात आला. प्रतिवादी क्र.४ व तर्फे वकील वारंवार पुकारता गैरहजर. तपासणी अहवालातील पुर्ततेकामी सदरचा अर्ज निकाली काढण्या संदर्भात निर्देश दिले असलेमुळे सदरचा अर्ज आजरोजी गुणदोषावर निकाली काढण्याकरीता घेण्यात आला.

५. वादी व प्रतिवादींची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता, कागदपत्रांची

पाहणी करता पुढील मुद्दे माझे समक्ष उभे राहतात. त्यावर मी माझे कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... नाही |
| २. | अनुकुलतेचा समतोल वादींचे बाजुने आहे का ? | ... नाही |
| ३. | अर्ज नामंजूर झालेस वादींची अपरिमित हानी होईल का? | ... नाही |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ बाबत –

कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी सर्व मुद्दे एकत्रित विचारात घेत आहे.

६. वादीतर्फे वाद मिळकतीसंदर्भात ७/१२ उतारे, एस.आर.७७/२०१८ मधील आदेशाची प्रत, प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसांच्या स्थळप्रती, प्रतिवादी क्र.२ यांनी वादीस पाठविलेली नोटीस, मा. अध्यक्ष अनुसुचित जाती जमाती आयोग यांचे आदेश पत्र, स्थळपाहणी पंचनामे, जबाब, हरकती, फोटो इत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.४ याने सरबांधाचे फोटो, जबाब, पंचनामा इत्यादी कागदपत्र दाखल केले आहेत.

७. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम १४३ नुसार तहसिलदार यांना सरबांधावरुन रस्ता मंजूर करण्याचे अधिकार आहेत. परंतु सदर प्रकरणात सरबांधावरुन कोणताही रस्ता अस्तित्वात नाही. दि.२२.०३.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांनी निर्देश दिले असल्यामुळे महसुल अधिकारी यांनी कोणत्याही कायदेशीर बाबींची पुर्तता न करता एकतर्फी निर्णय देवून कारवाई करीत आहेत व स्थळ पाहणी पंचनाम्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येत आहेत. दि.२७.०६.२०१८ रोजी झालेल्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये रस्ता उपलब्ध नाही असे नमूद केलेले दिसते. दि.०८.०७.२०२२ रोजी तहसिलदार यांनी केलेल्या आदेशामध्ये सरबांध आहे असे नमूद आहे. दि.०४.१०.२०२३ च्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये सरबांध आहे असे नमूद आहे. दि. २३.१२.२०२० रोजी झालेल्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये रस्ता अस्तित्वात नाही असे नमूद आहे. सरबांधावरुन रस्ता अस्तित्वात नसतानाही महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांनी निर्देश दिले असल्यामुळे महसुल अधिकारी यांनी नंतर तयार करण्यात आलेल्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये रस्ता अस्तित्वात असल्याचे नमूद केले आहे. वास्तविक सरबांधावरुन कोणताही रस्ता अस्तित्वात नसल्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणे आवश्यक आहे. तसे झाल्यास वादी यांचे पिकाखालचे क्षेत्र रस्त्यामध्ये गेल्यामुळे वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तसेच वादी यांच्या मिळकतीमध्ये बदल होणार आहे व त्यामुळे अपरिमित नुकसान होत असेल तर मनाई देता येईल. सदर म्हणण्याच्या पृष्टयर्थ वादींनी मा. सर्वोच्च न्यायालयाचा खालील न्यायनिवाडा दाखल केला आहे.

*Maharwal Khewaji Trust (Regd.), Faridkot Vs. Baldev Dass, (2004) AIR (SCW) 6333.*

८. प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जमीन महसुल कायदा १९६६ कलम १४३ प्रमाणे आदेश करण्याचे अधिकार तहसिलदार यांना आहेत. दि.०८.०७.२०२२ रोजीचा आदेश बेकायदेशीर असल्याचे कोणत्याही न्यायालयाकडून घोषीत करण्यात आलेले नाही आणि असे असता वादी यांना तुर्तातुर्त ताकीद मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

९. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता वेगवेगळे स्थळपाहणी पंचनामे अभिलेखावर दाखल आहेत. काही स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये सरबांध आहे असे नमूद आहे. तर काही स्थळपाहणी पंचनाम्यांमध्ये रस्ता अस्तित्वात नाही असे नमूद आहे. दि.२७.०६.२०१८ च्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये रस्ता समजून येत नाही असे नमूद आहे. परंतु त्यामध्ये गट क्र.४१८ चा उल्लेख नाही. सदर पंचनाम्यामध्ये अर्जदार/प्रतिवादी हे पाहणीच्या वेळी उपलब्ध नसल्यामुळे रस्ता आहे किंवा नाही हे समजून येत नाही असे लिहीलेले आहे. परंतु सदर दिवशीच प्रतिवादी क्र.४ चा जबाब घेतल्याचे दिसून येते. यावरुनच सर्व स्थळपाहणी पंचनाम्यांबाबत साशंकता निर्माण होते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीत सरबांध आहे किंवा कसे ही बाब दावा गुणदोषावर निकाली निघालेनंतर सिध्द होणार आहे. त्यामुळे वादी हे प्रथमदर्शनी केस सिध्द करण्यास अपयशी ठरलेले आहेत. अशा परिस्थीतीत प्रतिवादींतर्फे न्यायाचा समतोल जातो. अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत वादी मागतात ती मनाई मंजूर करता येणार नाही. त्यामुळे उपरोक्त कारणास्तव मी सदर मुद्दयांस त्याप्रमाणे निष्कर्ष देवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

(१) वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(२) अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.10.17 15:36:03 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)

दिनांक–१५.१०.२०२५. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.